### थोडक्यात

## शंभर वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना मालकीहक्क द्यावा!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भुसावळ** प्रतिनिधी

शंभर वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना मालकीहक्क द्यावा अशी मागणी भारतीय जनता पार्टी जळगाव जिल्हा कामगार मोर्चाकडून करण्यात आली आहे.

भुसावळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय सावकारे यांना कामगार नेते राजू खरारे यांनी निवेदन दिले. या निवेदनामध्ये जामनेर रोडवरील अहिल्यादेवी कन्या विद्यालयासमोरील वाल्मीक नगर, रमाबाई आंबेडकर नगर व अण्णाभाऊ साठे नगर या भागातील रहिवाशांना मालकीहक्क मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सदर भाग अनुसुचित जाती व मागासवर्गीय समाजाचा स्लम परिसर असून, गेल्या १०० वर्षांपासून रहिवासी या ठिकाणी वास्तव्यास आहेत. तथापी, अद्याप त्यांना त्यांच्या राहत्या जागेचा मालकीहक्क मिळालेला नाही. या पार्श्वभूमीवर, शासन स्तरावर त्वरित कार्यवाही करून संबंधित नागरिकांना मालकीहक्क मिळवून देण्यात यावा, अशी मागणी कामगार मोर्चाने निवेदनाद्वारे केली आहे.



**जळगाव : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात महानगरपालिकेकडून आरोग्याची काळजी घेतली जात असून शहरातील विविध भागात कंटेनर सर्वेक्षण व धुळ फवारणी करण्यात येत आहे. आरोग्याच्या दृष्टीने महापालिकेने हे पाऊल उचलले असून पाणी व रक्ताचे नमूने देखील घेतले जात आहे.**

# बचत गटातील महिला म्हणजे कुटुंबाची ताकद!

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे प्रतिपादन : 'पद्मालय' महिला संघाची सभा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

बचत गटातील प्रत्येक महिला ही आपल्या घराची अर्थमंत्री आहे. बचत गटाच्या माध्यमातून व्यवसायाला चालना द्या, पारदर्शकता ठेवा, आणि वेळेवर ऑडिट सादर करा. व्यवसायात विश्वासार्हता जपा. 'लखपती दीदी' होण्यासाठी फक्त कर्ज नाही, तर कल्पकता लागते, असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

म्हसावद-बोरनार जिल्हा परिषद गटातील 'पद्मालय'



महिला प्रभाग संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात पार पडली.

यावेळी हजारो बचत गट महिलांच्या उपस्थितीत पालकमंत्री पाटील यांनी महिलांना मार्गदर्शन क ल .

बचत गट म्हणजे छोटा संसार, पण त्यात लपलेला असतो मोठा व्यापार. तुमचा व्यवसाय तुम्हीच ठरवा, नाविन्यपूर्ण उत्पादन घ्या आणि मार्केटिंग शिका. दर्जा टिकवा आणि ग्राहकांचा विश्वास जिंका, असा मौलिक सल्ला त्यांनी दिला. ते म्हणाले की, बचत गट हा गावाचा खरा कणा आहे. आईनंतर सर्वात जास्त काळजी घेणारी व्यक्ती म्हणजे बहीणच असते. आपल्या भाषणातून त्यांनी बहिणीच्या मायेला साद घालून सभागृहात भावनिक लहर निर्माण केली.

या कार्यक्रमाला माजी महापौर विष्णू भंगाळे, जिल्हा ग्रामीण विकास प्रकल्पाचे संचालक राजू लोखंडे, गटविकास अधिकारी श्वेता पालवे, पवन सोनवणे, रवी कापडणे, अभियान व्यवस्थापक हरेश्वर भोई, सरपंच अनिल पाटील, शिवराज पाटील, राजेंद्र चव्हाण, समाधान पाटील, रविंद्र सुर्यवंशी, शितल चिंचोरे, सचिन पाटील, संदीप सुरळकर उपस्थित होते.

**'बहिणाई मार्ट' उभारणार!**

महिला बचत गटांना बाजारपेठ मिळावी या उद्देशाने एक कोटी रुपयांच्या खर्चाने म्हसावद येथे 'बहिणाई मार्ट' उभारण्यात येणार असल्याची घोषणा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केली. लवकरच या प्रकल्पाचे भूमिपूजन होणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. यावेळी वसंत वाडी, वडली, विटनेर, वावडदा, बिलवाडी, पाथरी-कुऱ्हाडदे, बिलाखेदा, वराड बु. व डोमगाव येथील महिला बचत गटांना ८७ लाख रुपयांचे स्वयंसहायता व गुंतवणूक निधीचे धनादेश पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.



## हवामान तज्ज्ञ पंजाबराव डक यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी

हवामानाचे गाढे अभ्यासक प्रसिद्ध हवामानातज्ज्ञ पंजाबराव डक यांनी पारोळा तालुक्यातील धुळपिंप्री येथे शेतकऱ्यांना हवामान संदर्भात मार्गदर्शन केले.

पारोळा तालुक्यातील धुळपिंप्री येथे हवामान विशेषक म्हणून ओळख असलेले पंजाबराव डक यांनी येथे आयोजित शेतकरी भेट या कार्यक्रमात शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांचे समाधान केले. दि. ७ जूनपर्यंत सोयाबीन पेरणीस उत्तम कालावधी असल्याचे सांगून, जून महिन्यात पाऊस चांगला असेल असे त्यांनी सांगितले. येणाऱ्या वर्षातील पाऊस व सुधारीत शेती पद्धती विषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी धुळपिंप्री येथे शिवसेना शिंदे गटाचे तालुकाध्यक्ष मधुकर पाटील व ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार केला.

# मुक्ताईनगर ते पंढरपूर आषाढीवारी ६ जूनला प्रस्थान करणार!

## पालखी सोहळ्याचे यंदाचे ३१६ वे वर्ष : भक्तांच्या आनंदाला येणार उधाण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

श्रीक्षेत्र मुक्ताईनगर ते श्रीक्षेत्र पंढरपूर आषाढीवारी पालखी सोहळा दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा मोठ्या उत्साहाने हजारो वारकरी व भक्तांच्या उपस्थितीत साजरा होणार आहे. यंदाचे आषाढी वारीचे प्रस्थान ६ जून २०२५ रोजी होणार आहे.

आदिशक्ती संत मुक्ताई मूळ मंदिर कोथळी ज्या ठिकाणी संत मुक्ताई ७२८ वर्षांपूर्वी अंतर्धान पावल्या तेथून दरवर्षी हजारो वारकऱ्यांच्या साक्षीने मोठ्या उत्साहात आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी संत मुक्ताईच्या चांदीच्या पादुका या पंढरपूर येथे जात असतात. यंदाचे



आषाढी वारीचे ३१६वे वर्ष असून कोथळी येथील संत मुक्ताईच्या मूळ मंदिरातून दि. ६ जून रोजी दुपारी ३ वाजता प्रस्थान करणार आहे. पंढरपूर येथे दि. ३ जुलै रोजी दाखल होणार आहे. या आषाढी वारी पालखी सोहळ्यात हजारो वारकरी महिला पुरुष व भावीकभक्त सहभागी होत असतात. सहाशे किलोमीटर अंतर चालून सहा जिल्ह्यामधून पालखी सोहळ्याचा प्रवास असतो. जुने मंदिर कोथळी येथून प्रस्थान होऊन फुलांनी सजवलेल्या रथात संत मुक्ताईच्या चांदीच्या पादुका या मुक्ताईनगर शहरातून तीन किमी अंतर चालत मुक्ताईनगर येथील नवीन मंदिर मिरवणूक काढली जाते. यावेळी शहरात वारकऱ्यांना चहा नाश्ता व फराळाचे वाटप देखील केले जाते. रांगोळीने रस्त्यावर सजावट करून पालखीचे स्वागत केले जाते. नवीन मुक्ताई मंदिरात पालखी सोहळा पोहोचल्यानंतर त्या ठिकाणी पालखीचा पहिला मुक्काम होतो आणि त्यानंतर पालखी पुढे प्रवासासाठी मार्गस्थ होते. पालखी सोहळ्याच्या रथाला ओढण्यासाठी बैल जोडी राजेश पाटील, नाचनखेडा यांची असणार आहे. पालखी सोहळ्यासोबत दोन अश्व देखील असणार आहे ते अश्व संदीप रामचंद्र भुसे (मरकळ, ता.खेड) यांचे असणार आहे.

**पोलीस, आरोग्य पथक राहणार तैनात**

आषाढी वारी पालखी सोबत पोलिसांचा बंदोबस्त तसेच आरोग्य पथक रुग्णवाहिके सहित तैनात असेल. तसेच पाण्याचे चार टँकर देखील पालखी सोबत असतील. वारीतील भाविकांसाठी फिरते स्वच्छालय हे पालखी सोहळ्या सोबत असतील. संत मुक्ताई आषाढी वारी पालखी सोहळ्यामध्ये सुमारे दोन हजार वारकरी सहभागी होणार आहे.


